## ९. व्यावयायिक पाठ्याक्रमात शिकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देणे

| अ.क्र. | मुद्दा | तपशील |
|---|---|---|
| ०१ | अंमलबजावणी यंत्रणा | संबंधित प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
| ०२ | कायदे / नियम / शासन निर्णय | आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. आवगृ-१२०४/प्र.क्र.१८/का-१२, दि.२४ ऑगस्ट, २००४. |
| ०३ | थोडक्यात कार्यपध्दती व लाभ | आर्थिकदृष्ट्या परवडत नसल्यामुळे इतर आर्थिक सवलतीशिवाय व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागणाऱ्या खर्चाची तोंडमिळवणी करता यावी म्हणून निर्वाह भत्ता देण्याची योजना<br>अ. ४ ते ५ वर्षाच्या अभ्यासक्रमा साठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.७००/- दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. १०००/- दरमहा निर्वाह भत्ता<br>ब. २ ते ३ वर्षाच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.५००/-दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.७००/- दरमहा निर्वाह भत्ता<br>क. २ वर्ष किंवा त्यापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु.५००/- दरमहा व वसतिगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांना रु. ५००/- दरमहा निर्वाह भत्ता दिला जातो. |
| ०४ | पात्रता/निकष | १. अनुसूचित जमातीचा विद्यार्थी व्यावसायिक पाठयक्रमात प्रवेशित असावा.<br>२. विद्यार्थी भारत सरकार शिष्यवृत्तीधारक असावा.<br>३. व्यावसायिक पाठ्यक्रमांत शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांने प्रथम त्यांच्या महाविद्यालयाच्या वसतिगृहात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.<br>४. पालकाचे उत्पन्न भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेच्या पात्रतेसाठी जे उत्पन्न असेल तितके असावे. |
| ०५ | अर्जाचा मान्यता प्राप्त नमुना | ऑनलाईन अर्ज नमुना https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. |
| ०६ | अर्जाची किंमत असल्यास किती | सदर अर्ज विनामूल्य उपलब्ध आहेत. |
| ०७ | जोडावयाची कागदपत्रे | प्रत्यक्ष प्रवेश देतेवेळी सक्षम प्राधिकाऱ्याचा पालकाचा / विद्यार्थ्यांचा जमातीचा दाखला, जन्मतारखेचा दाखला, पालकाचा सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला उत्पन्नाचा दाखला. |